सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन -कृषी विभाग**

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

**३० ब, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४०० ००५**

**दूरध्वनी क्र.** ०२२-२२१६३३५१/२ **ई-मेल :**-mahapocra@gmail.com


जा क्र. नादेकृसंप्र- ०११८/ प्र क्र ११३/ संशे / दि. ३०.११.२०१८

प्रति,

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
(प्रकल्पातील सर्व जिल्हे)

**विषय :- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत संरक्षित शेती घटकांतर्गत मार्गदर्शक सूचना सन २०१८ - १९ (प्रशिक्षण शुल्काबाबत शुद्धीपत्रक)**

**संदर्भ :-** या कार्यालयाच्या मार्गदर्शक सूचना क्र. नादेकृसंप्र-०११८/प्र क्र११३/संशे/३२८, दि. ०६/०९/२०१८

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत संरक्षित शेती घटकांतर्गत मार्गदर्शक सूचना सन २०१८-१९ निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सुचनांमध्ये सर्वसाधारण सूचनांमध्ये मुद्दा क्र. ३ मध्ये हरितगृह किंवा शेडनेटगृह या बाबींचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना याबाबतचे तांत्रिक प्रशिक्षण अनुदान अदायगी पूर्वी घेणे बंधनकारक राहील. सदर प्रशिक्षणाची सोय राष्ट्रीय काढणीपश्चात तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्था (NIPHT), तळेगाव दाभाडे, ता. वडगाव मावळ, जि. पुणे येथे आहे. सदर प्रशिक्षणासाठी रु. ६०००/- शुल्क असून या पैकी रु. ५०००/- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामार्फत अदा करण्यात येईल. उर्वरीत रक्कम शेतक-याने स्वतः भरावयाची आहे.

**त्याऐवजी**

"हरितगृह किंवा शेडनेटगृह या बाबींचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना याबाबतचे तांत्रिक प्रशिक्षण अनुदान अदायगी पूर्वी घेणे बंधनकारक राहील. सदर प्रशिक्षणाची सोय राष्ट्रीय काढणीपश्चात तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्था (NIPHT), तळेगाव दाभाडे, ता. वडगाव मावळ, जि. पुणे येथे आहे. सदर प्रशिक्षणासाठी आवश्यक शुल्काची पूर्ण रक्कम नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामार्फत अदा करण्यात येईल." वाचावे असे स्पष्ट करण्यात येत आहे.

**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई**

**प्रत- माहितीस्तव सादर**

१.सचिव, कृषि व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई
२.प्रधान सचिव, पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई

**माहिती व पुढील कार्यावाहीस्तव अग्रेषित**

३.आयुक्त, कृषि , कृषि आयुक्तालय, पुणे
४.प्रकल्प संचालक, आत्मा (प्रकल्पांतर्गत सर्व)
५.उप विभागीय कृषि अधिकारी, (प्रकल्पांतर्गत सर्व)